# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. ३०३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १४/०६/२०१८

**१) तरुणीवर अत्याचार केल्याने गुन्हा नोंद :–**

सन २०१५ ते दिनांक १२/०६/२०१८ पर्यत आतील आरोपीने फिर्यादीस लग्नाचे आमिष दाखवुन तिचेवर वारंवार लैगिक अत्याचार करुन तिला गर्भधारणा करुन तिचेशी लग्न न करता दुसऱ्या मुलीशी लग्न केल्याने आरोपीस फिर्यादी ही अनुसुचीत ज्ञाती जमातीची असल्याचे माहीत असुन सुध्दा फिर्यादीशी लैगिक अत्याचार केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३७६(२)(एन) भादंवि. सहकलम ३(२)(५) अजाजअप्रका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. तिक्कस पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**२) संगनमत करुन बिना पास परवाना रेतीची चोरी करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १२/०६/२०१८ चे १९.०० वाजता दरम्यान यातील रेती वाहतुक करणारे टिप्परचे चालक यांनी आपआपले मालक यांच्याशी संगनमत करुन रेती घाटातुन अंदाजे ९६ ब्रास रेती किंमती १,९२,०००/–रु. व १९ टिप्पर किंमती २ करोड ५७ लाख ९२ हजार रुपये असा एकुण २ करोड ५९ लाख ८४ हजार रुपयाचा माल बिनापासपरवाना रेती चोरी करुन टिप्पर मध्ये घेवुन जातांनी मिळुन आल्याने गजानन सुरबाजी कोकारडे वय २२ वर्ष, रा. तहसील कार्यालय पवनी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३७९,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. चाबुकस्वार पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**२) बॅटऱ्यांची चोरी :–**

दिनांक ११/०६/२०१८ चे १५.००ते १२/०६/२०१८ चे १५.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी पवन सुधाकरराव मोरे वय ३० वर्ष, रा. गणपतपुर जि. वर्धा ह. मु. कुडवा नाका गोंदिया देखरेखील असलेल्या टॉवर वरील अमरराजा वरली सुपरच्या कंपनीचे एकुण २२ बॅटऱ्या किंमती ४४,०००/–रु. च्या कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. उबाडे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**४) चांदीचे सिक्के, नगदी पैसे व पुजेचे चिल्लर पैश्याची चोरी :–**

दिनांक १०/०६/२०१८ चे १०.०० ते १२/०६/२०१८ चे १९.०० वाजता दरम्यान यातील कोणीतरी अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचे समोरील दरवाज्याची कडी कोंडा तोडुन आत प्रवेश करुन घरात ठेवलेल्या आलमारीच्या लॉकर मधील स्टील च्या डब्यात ठेवलेले चांदीचे ०६ सिक्के, पांढऱ्या धातुचे प्रत्येकी ०५ ग्रॅम, प्रमाणे अंदाजे वजन ३० ग्रॅम, पॉकेट मध्ये ठेवलेले नगदी /–रु. च्या ८ नोटा, १००/–रु. नोटा व देवाचे पुजेचे चिल्लर अंदाजे ८००/–रु. एकुण ७३,०००/–रु. असा एकुण ८,८००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी मुन्नीला पोतन गौतम वय ५१ वर्ष, रा. बिनाखी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ४५४,४५७,३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. सेलोकर पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**५) क्षुल्लक कारणावरुन भांडण करुन थापड बुक्यांनी मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १२/०६/२०१८ चे २२.१५ वाजता दरम्यान यातील आरोपी व फिर्यादी हे काका पुतण्या असुन आरोपी हा दारु पाणी पिवुन फिर्यादीस शिवीगाळ करीत असतांना फिर्यादीने त्यास हटकले असता आरोपीने फिर्यादीस थापड बुक्यांनी मारुन आरोपीच्या हातातील कडा फिर्यादीच्या डोक्याला लागुन फिर्यादीस जखमी केल्याने फिर्यादी यशवंत भरणु गजबे वय ५६ वर्ष, गोसे यांचे व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३२४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. गिन्हेपुंजे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**६) ट्रॅक्टर रिव्हर्स घेवुन एकास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १३/०६/२०१८ चे १२.३४ वाजता दरम्यान यातील आरोपीने त्याचे ताब्यातील ट्रॅक्टर निष्काळजीपने रिव्हर्स घेवुन फिर्यादी चा मुलगा जखमी संतोष रामदास मसाजी मोहरकर यास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी रामदास मसाजी मोहरकर वय ६० वर्ष, रा. पिंपळगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २७९,३३७ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. जाधव पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**७) विटाने डोक्यावर मारुन जखमी केल्याने व मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १२/०६/२०१८ चे १७.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी सिध्दार्थ कारु नागदेवे वय ५६ वर्ष, रा. डव्वा हा गव्हाचा दळणाचा डब्बा आणने कामी आटा चक्कीवर जात असता यातील आरोपीने फिर्यादीस घरा समोरुन जातांना पाहुण हातात विट घेवुन फिर्यादीस तुम्ही माझे सुने सोबत का बोलता, असे म्हणुन हातातील विटाने डोक्यावर मारुन जखमी केले व फिर्यादीचे मुलास मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३२४,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**८) क्षुल्लक कारणावरुन भांडण करुन हाताचे मनगटावर दाताने चावा घेवुन शिवीगाळ केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १२/०६/२०१८ चे २१.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी चा आरोपी पती हा दारु पिऊन घरी आल्याने त्यास फियादीने हटकले असता मारण्यास धावला असता जखमी आशिष विठ्ठल पंधरे हा आडवा झाला असता तु मधात बोलनारा कोण म्हणुन भांडण करुन त्याचे डावे हाताचे मनगटावर दाताने चावा घेवनु जखमी करुन शिवीगाळ केल्याने फिर्यादी सौ. रेखा शैलेश वाढीवे वय ३० वर्ष, रा. नेरोडी यांचे तोंडी व जखमीचे एमएलसी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३२४,५०४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**९) नवजात मुलीचा मृत्यु :—**

दिनांक २८ /०६/२०१८ चे १२.३० वाजता दरम्यान यातील अष्टविनायक हॉस्पीटल भंडारा येथे दिनांक २८/०५/२०१८ चे १२.३० वाजता दरम्यान वैशाली मुकेश गोंडाने वय ३० वर्ष, रा. गांधी वार्ड वरठी हीची डिलेव्हरी होवुन मुलगी झाली मृतक मुलीचे हृदयाचे ठोके कमी होवुन प्रकृती खराब झाल्याने तीला प्रथम उपचार करुन पुढील उपचारा करीता नागपुर मेडीकल कॉलेज येथे आकस्मीक विभागात आनले असता तेथील डॉ. सि.एम.ओ. गोरमारे यांनी तपासुन १५.२० वाजता दरम्यान मृत घोषीत केल्याने पो. स्टे अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी सफौ. घरडे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अवये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गोंडाने पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**७) अवैध हातभट्टी व देशी दारु / जुगार अडड्यांवर धाडी . :—**

दिनांक १३/०६/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन सिहोरा, लाखांदुर व भंडारा येथे हातभट्टी व देशी दारु/जुगार अड्डयावर धाडी घालुन ०६ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ३५ लिटर हातभट्टी दारु किंमती २३००/—रु. २१ लिटर ८६० मिली लिटर देशी/विदेशी/बिअर किंमती ६५०१ /—रु. असा एकुण ८८०१/—रु. तसेच जुगारातुन किंमती ६५०/—रु. असा एकुण ९,४५१/—रु. चा माल जप्त करण्यात आला.

**८ ) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक १३/०६/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १०१ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी — ०२ तीन सिटर वाहनाकरीता— १२ ईतर वाहनांवरती — ८७ केसेस करण्यात आले आहे.

(मपोउपनि.प्रणती लांजेवार)
माहिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.